चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२८ सप्टेंबर, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# पोलीस स्टेशन रामनगर आणि मुल यांची दारूतस्करीवर धडाकेबाज कार्यवाही

## ०६ आरोपीसह ४८ लक्ष १५ हजार ६०० रू चा मुद्देमाल जप्त

आज दिनांक २८/०९/२०१९ रोजी पोलीस स्टेशन रामनगर आणि पोलीस स्टेशन मुल येथील पोलीस पथकाने अवैध दारू तस्करी करणाऱ्यांवर कार्यवाही करीत ०६ आरोपीस अटक करून **एकुण ४८ लक्ष १५ हजार ६००** रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

आज रोजी पोलीस स्टेशन रामनगर येथील गुन्हे शोध पथकाने मिळालेल्या गोपनीय माहिती वरून एका चारचाकी आयशर ट्रकचा पाठलाग करून होंडा शोरूम मुल रोड चंद्रपुर या ठिकाणी ताब्यात घेतले. संशयावरून वाहन चालकास विचारपुस करून सदर वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये १६० बॉक्स देशी दारू किं. १६,००,०००/—रू दारूचा माल मिळुन आला. सदरची दारू आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेले वाहन आयशर ट्रक किं. १५,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. १०,०००/— असा **एकुण ३१,१०,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यावरून आरोपी नामे आकाश राधेशाम कटीयार वय २५ रा. बल्लारशाह यास अटक करण्यात आले असुन पोलीस स्टेशन रामनगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दुसरीकडे पोलीस स्टेशन मुल येथील पोलीस पथकाने गोपनीय माहितीवरून चामोर्शी नाका मुल येथे नाकाबंदी लावुन नागपुर ते मुल कडे येणाऱ्या दोन चारचाकी वाहनास संशयावरून थांबवुन वाहनाची झडती घेतली असता २४ बॉक्स मॅकडोल नंबरवन विदेशी दारू कि. ३,४५,६००/—रू चा दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा दारूचा माल आणि दारू वाहतुकीकरीता वापरलेली एक मारूती सुजुकी रिटस् क्र. एमएच ४० एटी ८१९९ आणि टाटा झिस्ट क्र. एम एच ४० एटी ८१७१ एकुण किं. १३,००,००० आणि ५ मोबाईल फोन किं. ६०,०००/—रू असा एकुण **१७,०५,६००/—रू चा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन मुल येथे नोंद करण्यात आला असुन ०५ आरोपी नामे १) परवेज इरशाद, २) प्रकाश प्रमोद रंगारी ३) भुषण अशोक डुंबारे ४) हर्षल विनोद मोटघरे, ५) विजय बाबुराव तायवाडे सर्व रा. नागपुर यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची दोन्ही कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात रामनगर पोलीस स्टेशन प्रभारी पोनि. श्री. हाके यांचे नेतृत्वात सपोनि. दरेकर, सफौ. माहुलीकर, जाधव, पोहवा. कामडी, गजानन, पोना. किशोर, पोशि. राकेश, माजीद यांनी तर पोलीस स्टेशन मुल येथील कार्यवाही पोनि. श्री. सतीशसिंह राजपतु यांचे नेतृत्वात पोना. परचाके, मुकेश गजबे, पोशि. शफीक शेख, गजानन कुरेकर, होमगार्ड अक्षय चालुरकर यांनी पार पाडली.